जनसामान्यांच्या मनातील आरसा

# वरुड दर्पण

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
१२.०९.२०२६

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २६४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## भंडाऱ्यात भीषण अपघातात वर्मा कुटूंबातील चौघांचा तर उईके कुटूंबातील आईसह दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी अंत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### आईच्या प्रेमाला मुकले ५ चिमुकले



**भंडारा** – लाखनी पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपळगाव इथं काल (११ सप्टेंबर) पहाटे झालेल्या भीषण अपघातात घटनास्थळी ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झालाय तर १३ जण जखमी झाले आहेत. या सर्व अपघातग्रस्तांची ओळख पटली आहे. या भीषण अपघातात वर्मा कुटूंबातील आई, चिमुकली, आजी आणि अन्य एक महिला नातेवाईक अशा चौघांचा मृत्यू झाला तर उईके कुटूंबातील आईसह तिच्या दोन बाळांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. यासोबत अन्य तीन महिलांचा या भीषण अपघातात मृत्यू झाल्यानं त्यांचे पाच मुलं आईच्या प्रेमाला मुकले आहेत. हे सर्व अपघातग्रस्त छत्तीसगडमधून बोलेरो वाहनानं नागपूरला जात असताना हा भीषण अपघात घडला. या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर १३ जणांपैकी काहींवर भंडारा, नागपूर इथं उपचार करण्यात येत आहे. तर, किरकोळ जखमींना सुट्टी देण्यात आली आहे.

भंडाराच्या लाखनी पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपळगाव आणि मुंडीपार गावादरम्यान झालेल्या भीषण अपघातात घटनास्थळी ८ जणांचा तर उपचारासाठी नेत असताना एका अशा ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तर १३ जण जखमी झाले असून यातील काही गंभीर जखमी आहेत. या सर्व अपघातग्रस्तांची ओळख लाखनी पोलिसांनी पटविली आहे. या घटनेतील मृतक आणि जखमी हे सर्व छत्तीसगड राज्यातील असल्यानं त्यांची ओळख पटवितांना लाखनी पोलिसांना ही मोठी कसरत करावी लागली. नागपूरच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या बोलेरो वाहनामध्ये चालक, महिलांसह १० बालक असे एकूण २२ जण प्रवास करीत होते. पिंपळगाव येथील पेट्रोल पंप वरून बाहेर निघालेले आयशर ट्रकवर भरधाव बोलेरो धडकल्यानं या भीषण अपघातात ६ महिला आणि ३ बालकांचा मृत्यू झाला तर १३ जणांवर भंडारा, नागपूर इथं उपचार करण्यात येत असून या अपघातात किरकोळ जखमी झालेल्यांना नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## हैद्राबादहून परत येत असतांना रेल्वेतून पडून दोघांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### एक झटामझिरी तर दुसरा मोठी भेंमडी येथील रहिवाशी : तालुक्यात शोक





**वरुड** – तेलांगणाच्या हैद्राबादमध्ये मजुरीसाठी गेलेल्या तालुक्यातील दोन युवकांचा ट्रेनमधून पडून मृत्यू झाल्याची घटना अकोला जिल्हयाच्या मुर्तिजापुर नजीक घडल्याची घटना आज सकाळच्या सुमारास उघडकीस आली. ऐन पोळयाच्या दिवशी घडलेल्या या घटनेने तालुक्यात खळबळ माजली असून एक युवक झटामझिरी येथील तर दुसरा मोठी भेंमडी येथील रहिवाशी आहे. या प्रकरणी मुर्तिजापुर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असुन हा अपघात नेमका घडला तरी कसा? याबाबत वृत्त लिहीस्तोवर माहीती मिळु शकली नाही.

प्राप्त माहीतीनुसार, वरुड तालुक्यातील विविध गावातील विशेष म्हणजे आदिवाशी बहुल भागातील युवक आणि युवती हैद्राबाद येथे मजुरीसाठी सतत ये-जा करीत असतात. वरुडहून थेट हैद्राबाद येथे जाण्याकरीता रेल्वेची व्यवस्था असल्यामुळे मोठया प्रमाणात मजुर पोटाची खळगी भरण्याकरीता जात असतात. मोठी भेंमडी कुणाल हरिदास आहाके (१७) व झटामझिरी येथील कैलास देवराव धुर्वे (३२) यांच्यासह काही मजुरी काही दिवसांपुर्वी हैद्राबाद येथे गेले होते. पुढे असलेल्या पोळा सणाच्या उददेशाने गेल्या मंगळवारी या दोघांसहीत काही मजुर काचीगुडा-नरखेड एक्सप्रेसने वरुडकडे येण्यासाठी निघाले. सकाळी ७.१० च्या सुमारास ही रेल्वे काचीगुडा रेल्वेस्टेशन वरुन वरुडकडे येण्यासाठी निघाली. त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास ही रेल्वे मुर्तिजापुरला पोहचत असतांना कुणाल आणि कैलास हे दोघेही रेल्वेतुन खाली पडल्याचे सांगितले जात आहे. रात्रीची घटना असल्यामुळे ते दोघे रेल्वे ट्रॅकवर पडले राहले, सकाळच्या सुमारास दोघांचे मृतदेह आढळून आल्यानंतर रेल्वे पोलिसांना माहीती देण्यात आली. पोलिसांनी पंचनामा करुन दोघांचेही मृतदेह शवविच्छेदन गृहात रवाना केले. दोघांचीही ओळख पटत नसल्यामुळे मोठया प्रयत्नाने हे दोघे वरुड तालुक्यातील रहिवाशी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मुर्तिजापुर पोलिसांनी वरुड तालुक्यात संपर्क केला असता त्यातील एक कैलास देवराव धुर्वे (३२) रा.झटामझिरी तर दुसरा भेंमडी कुणाल हरिदास आहाके (१७) रा.मोठी भेंमडी येथील रहिवाशी असल्याचे निष्पन्न झाले. आज दुपारच्या सुमारास दोन्ही मृतकांचे नातेवाईक मुर्तिजापुरकडे रवाना झाले. ओळख परेड झाल्यानंतर दोघांचेही शवविच्छेदन पार पडले. रात्री उशिराच्या सुमारास दोघांचेही मृतदेह आपआपल्या गावी आणुन त्यांचेवर अंत्यंस्कार करण्यात येणार आहे.

वृत्त लिहीस्तोवर हा अपघात नेमका कसा घडला? याबाबत माहीती मिळु शकली नाही. ऐन पोळयाच्या दिवशी घडलेल्या या घटनेने तालुक्यात खळबळ माजली आहे. एकाच अपघातात दोघांच्या मृत्यमुळे खळबळ माजली आहे.

## रेल्वे पुलाची ना.शिवेंद्रराजेंकडून पाहणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – रेल्वे मार्गीकेचा विस्तार, अप्रोच रोड आदिंसह सर्व तांत्रिक बाबींचा सखोल विचार करून शहरातील मध्यवर्ती रेल्वे स्टेशन येथील पुलाचे काम ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होणार असून हे काम गतीने पूर्ण करून स्थानिक नागरिकांची गैरसोय लवकर दूर करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे यांनी आज येथे दिली.

येथील जुना व जीर्ण झाल्याने पाडण्यात आलेल्या रेल्वे पुलाची पाहणी मंत्री भोसले यांनी केली. आमदार सुलभा खोडके, राजेश वानखडे, संजय खोडके, प्रवीण पोटे, महारेलचे सह महाव्यवस्थापक संग्राम पाटील, सार्वजनिक बांधकाम अमरावती प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंता सुषमा बोंद्रे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मंत्री भोसले यांनी सांगितले.विधिमंडळात अमरावतीतील या रेल्वे पुलाचा विषय उपस्थित झाला होता व राज्य शासनाने यास सकारात्मक प्रतिसाद देत हे काम तातडीने हाती घेण्याचा निर्णय घेतला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने या कामासाठी अर्थसंकल्पात १३० कोटींची तरतूद करून निधीस मंजुरीही देण्यात आली.

## अमरावती विभागातील बांधकाम विभागाच्या कामांचा आढावा

## रस्ते, पुल, इमारतींचे कामे दर्जेदार करावेत -मंत्री शिवेंद्रराजे भोसले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)







**अमरावती** – सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते, पुल आणि इमारतींचे कामे केली जातात. ही कामे जनतेच्या सोयीसुविधांसाठी केली जात असल्याने ही कामे दर्जेदार करण्यावर भर द्यावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात मंत्री श्री. भोसले यांनी अमरावती विभागातील बांधकाम विभागाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी आमदार प्रविण पोटे, संजय खोडके, प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, हरीष पिंपळे, सुलभा खोडके, राजेश वानखडे, उमेश यावलकर, प्रविण तायडे, किसन वानखडे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. भोसले म्हणाले, धोकादायक पुलांची माहिती घेण्यात आली आहे. या पुलांची माहिती घेण्यात यावी. तसेच आवश्यक ती देखभाल, दुरूस्ती करण्यात यावी. ज्यामुळे कोणतीही दुर्घटना होणार नाही, याची काळजी घ्यावी. पुलाला लोखंडी काठड्यांपेक्षा सिमेंटची कठडे उभारून कायमस्वरूपी व्यवस्था करण्याचे तपासून पहावे. रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात येत आहे. तातडीची उपाययोजना म्हणून मुरूमाने ही खड्डे भरण्यात यावीत. वनक्षेत्रातील रस्ते सध्या अस्तित्वात असलेल्या रूंदीमध्ये बळकट करणे शक्य आहे. त्यामुळे विभागाने ही कामे सुचवावित.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते आणि इतर कामे करण्याअगोदर लोकप्रतिनिधींना अवगत करावे. यामुळे आवश्यक असणारे कामे सुटणार नाहीत. रस्त्यांची कामे झाल्यानंतर वृक्षारोपण करण्यात यावे. रस्त्यांच्या थोडी दूरवर झाडे लावल्यास भविष्यात रस्त्यांमध्ये अडथळा येणार नाही. तसेच कडूनिंब, वड आणि पिंपळाची झाडे लावल्यास ती दिर्घकाळपर्यंत टिकण्यास मदत होईल. ही झाडे जगविण्यावर भर देण्यात यावा. नागरिकांच्या सुविधांसाठी सुविधा केंद्र उभारण्यात येत आहे. ही केंद्रे सुस्थितीत राहणे आणि नागरिकांच्या वापरात राहण्यासाठी खासगी संस्थांना देण्यात यावी. आवश्यकता पडल्यास महिला बचतगटांना दिल्यास त्याची निगा राखली जाईल.

बैठकीत अमृतकाल रस्ते, विकास आराखडा, धोकादायक पुल, आदिवासी क्षेत्रातील इमारती आदीबाबत सादरीकरण

## १४ गणपती बसवायचा आणि निघायचं, १५ ला अंतरवालीतून निघायचं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**जालना** _ मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी अंतरवाली सराटीतून मुंबईतील मराठा आंदोलनाची घोषणा केली. त्यानुसार मनोज जरांगे अंतरवाली सराटीतून मुंबईला नक्की किती तारखेला निघणार, याबाबत स्पष्टता नाही. मनोज जरांगे यांनी मार्ग जाहीर केला, मात्र कधी निघणार, तारीख काय, याबाबत अद्याप संभ्रम आहे. आपला पहिला मुक्काम बीडच्या पाटोद्यात असेल, असे जरांगेंनी सांगितले. याशिवाय अजून तारीख जाहीर केली नाही, जेव्हा तारीख ठरेल तेव्हा वादळ उठेल असं जरांगे म्हणाले.

अंतरवाली सराटीतून ठिकठिकाणी मुक्काम करत मनोज जरांगे यांचा मराठा मोर्चा मुंबईत पोहोचणार आहे. प्रत्येक मुक्कामापूर्वी आपण दररोज १०० किलोमीटर अंतर पार करु, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे आता मराठा मोर्चा सप्टेंबर महिन्यात निघाल्यास गणेश विसर्जनापूर्वी मुंबईत पोहोचणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसं झाल्यास मुंबई पोलीस परिस्थिती कशाप्रकारे हाताळणार, हे बघावे लागेल.



# न्यू इंग्लिश प्राथमिक शाळेत डॉ.राधाकृष्णान यांचा जन्मदिन शिक्षक दिन साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश प्राथमिक शाळा शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षी शाळेत 'स्वयंशासित शाळा' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका अतिशय उत्साहाने पार पाडत संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व काय आहे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी किती उपयुक्त आहे, याबद्दल शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्वयंशासित शाळेअंतर्गत विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे उत्स्फूर्त स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन केले तसेच काही विद्यार्थ्यांनी सर आणि मॅडम यांची वेशभूषा करून शिक्षकांची भूमिका साकारली.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन, स्वागत, खेळांचे आयोजन तसेच शिक्षकांच्या भूमिकेचे सादरीकरण अतिशय सुंदर पद्धतीने केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या केले.

## स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल येथे
# गोकुळाष्टमीचा कार्यक्रम उत्साहात



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे गोकुळाष्टमीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी गुरुकुलातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राधा–कृष्णाच्या आकर्षक वेशभूषेत सहभाग घेतला. राधा–कृष्णाच्या वेशातील मुलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लहान मुलांच्या मनमोहक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेली दहीहंडी मुलांच्या हस्ते फोडण्यात आली. यावेळी 'गोविंदा आला रे आला' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रणजित इंगोले होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रसिद्ध चित्रकार युवराज ठाकरे आणि गुरुकुलाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे उपस्थित होते. यावेळी रुपाली बघेल यांनी गोकुळाष्टमीचे पौराणिक व सांस्कृतिक महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे संचालन कविता वंजारी, प्रास्ताविक व संपूर्ण नियोजन ऋतुजा घोरमाडे, हर्षा वंजारी, उदय घोरमाडे आणि ज्योती शेंडे यांनी केले.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६: गणेश मंडळांना सहभागाचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती तालुका, जिल्हा, राज्य यासोबतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढविण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' ची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र मंडळांना पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या सरपशीहीं–ीरीं.श्रिवाज्ञर.ले.ळप या अधिकृत पोर्टलवर अर्ज सादर करता येणार आहे. स्पर्धा पूर्णपणे विनामूल्य असून, केवळ संबंधित शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असलेल्या संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाच यामध्ये भाग घेता येईल.

या संपूर्ण स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई कार्य पाहत आहे. स्पर्धेतील विजेत्यांना विविध स्तरांवर आकर्षक रोख बक्षिसे व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये रोख.जिल्हा स्तर: प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३० हजार रुपये रोख. तर राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे ७ लाख ५० हजार रुपये, ५ लाख रुपये आणि २ लाख ५० हजार रुपये रोख असे आहे. याशिवाय, जिल्हास्तरावरून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडल्या जाणाऱ्या इतर मंडळांनाही शासन निर्णयानुसार प्रोत्साहनपर पारितोषिके दिली जातील. विजेत्यांची निवड प्रत्येक स्तरावर गठीत करण्यात आलेल्या विशेष निवड समितीमार्फत अत्यंत पारदर्शक पद्धतीने केली जाईल.अमरावती जिल्ह्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी त्वरित अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी आणि विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे .

## कॅलेंडर तोंडपाठ करण्याचा विश्वविक्रम करणारे
# सुभाष दाभिरकर यांचा लोणी येथे गौरव




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – भूमितीमधील 'पाय' चे अचुक मुल्य शोधून काढणारे तसेच ३००० वर्षाचे कॅलेंडर तोंडपाठ करण्याचा विश्वविक्रम करणारे क्षणार्धात गणित पुस्तकाचे लेखक सुभाष दाभिरकर यांचा नुकताच वं.वसंतदास महाराज ग्रामिण बिगर शेती पतसंस्था लोणी यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाल मालपे यांच्या हस्ते सुभाष दाभिरकर यांना शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी उपाध्यक्ष वासुदेवराव पोहरकर, योगेश वांगे, लक्ष्मीकांत काळे, अरुण खेरडे, सुधिर ढोले, सुधिर बायमोरे, संजय गुल्हाने, दामोधर आंडे, प्रकाश मालपे, आशा देशमुख उपस्थित होते.

सुभाष दाभिरकर यांनी लॉग टेबल, पिरॉडीक टेबल, देशातील संपूर्ण शहरांचे एसटीडी कोड नंबर, पिनकोड नंबर, त्रिकोणमिती मधील १० हजार पर्यंतच्या किंमती पाठ केल्या होत्या. तसेच ते कोणत्याही तारखेचा वार क्षणार्धात सांगतात. तसेच क्षणार्धात आकडेमोड करण्याचे तंत्र अवगत केले आहे.

सदर कार्यक्रम हा वं. वसंतदास महाराज ग्रामिण बिगर शेती पतसंस्था, लोणीचे वार्षिक आमसभेत घेण्यात होता.

# महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – महात्मा फुले इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा शेंदुरजनाघाट येथे ८ सप्टेंबरला आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

साक्षरता दिनाचे महत्त्व आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी याकरिता शाळेतून विद्यार्थ्यांची साक्षरता रॅली काढण्यात आली. या मध्ये वर्ग १ ली ते ४ च्या विद्यार्थ्यांची सहभाग घेतला. या रॅलीतून साक्षर भारत समर्थभारत असे घोष वाक्य विद्यार्थ्यांनी म्हटले. या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्या.मोघे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे संचालन शुभांगी पांडे यांनी केली. याप्रसंगी आंडे यांनी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. निरक्षर ते मुळ प्राचीन काळात लोकांची कशी फसवणुक होत होती, विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता मुख्याध्यापिका अर्चना मोघे व सर्व शिक्षिका आंडे, शुभांगी पांडे, करुणा निंबुळकर, मंजुषा अकर्ते, पूजा मेंढे, करिष्मा पोहरकर, मेघा मोरे, प्रियंका कोडापे, अश्विनी रडके, तसेच कर्मचारी वृंद वनिता वानखडे, माधुरी सुपले, वैभव सावरकर उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळा काटी येथे शाळा व्यवस्थापन समितीची निवड
# अध्यक्षपदी गजानन खडसे तर उपाध्यक्षपदी किर्ती नागवंशी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – जिल्हा परिषद शाळा काटी येथे शाळेच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देण्यासाठी नवीन शाळा व्यवस्थापन समितीची निवड उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. यावेळी गजानन शंकरराव खडसे यांची अध्यक्षपदी कीर्ती विकास नागवंशी यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

नवीन शाळा व्यवस्थापन समितीमध्ये महेंद्र विश्वासराव भड, संदीप पुंजाराम निकम, रवींद्र हिरा धूर्वे, प्रतिभा नंदकुमार पिंगळे, क्षमा परवीन रशीदखान पठाण, प्रियंका महेश सोसे आणि चेतना मंगेश होले यांची सदस्य म्हणुन निवड करण्यात आली. मुख्याध्यापक संजय फुटाणे यांची समितीच्या सचिवपदी निवड झाली. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शाळेच्या भौतिक सुविधांच्या उन्नतीसाठी तसेच पालक, शिक्षक व शाळा यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यासाठी नवीन व्यवस्थापन समिती प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. समिती निवड प्रक्रियेचे संचालन सुनीता वानखडे तर संगीता कहाते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये बीबीए नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ७ दिवसीय इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे बीबीए प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सात दिवसीय भव्य इंडक्शन प्रोग्राम उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुकर व्हावा, त्यांना व्यवस्थापन शिक्षणातील करिअरच्या विविध संधींची ओळख व्हावी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी प्राचार्या डॉ.प्राची ठाकरे यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून संस्थेची उद्दिष्टे व शैक्षणिक दृष्टिकोन याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जीवनात सातत्य, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा.चेतन गणोरकर व प्रा.सौरभ अकोटकर यांनी महाविद्यालयाचे शैक्षणिक नियम, शिस्त, उपस्थितीचे महत्त्व तसेच परीक्षा पद्धती याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

इंडक्शन प्रोग्रामच्या दुसऱ्या दिवशी एचव्हीपीएम कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अमरावती येथील डॉ.स्वप्निल काळे यांनी 'व्यवस्थापन शिक्षणातील करिअर संधी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अतुल खराड यांनी 'युवकांसाठी वित्तीय साक्षरता' या विषयावर व्याख्यान देताना डिजिटल व्यवहार, सायबर फसवणूक आणि आर्थिक नियोजनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणुन दिले.

तिसऱ्या दिवशी प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट अमरावती येथील डॉ.युवराज वैद्य यांनी नेतृत्वगुण व कौशल्य विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच नबिरा महाविद्यालय काटोल येथील व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.प्रदीप महाजन यांनी 'उद्योग क्षेत्रातील अपेक्षा व रोजगारक्षमता' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

इंडक्शन प्रोग्रामच्या उत्तरार्धात माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, चित्रकला स्पर्धा, बिझनेस क्विझ तसेच विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले. शेवटच्या दिवशी योग, झुम्बा आणि विविध व्यवस्थापन खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

प्राचार्या डॉ.प्राची ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सात दिवसीय इंडक्शन प्रोग्रामच्या यशस्वितेसाठी बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.प्रफुल्ल बोहरुपी, प्रा.अस्मिता गेडाम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संपादकीय

**श्रध्दा बुध्दीला दिशा देते आणि कर्तव्य जीवनाला अर्थ देते, या दोन्हीचा समतोल साधणारा माणुसच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो.**

## गणेशोत्सव : श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक जबाबदारीचा उत्सव

गणपती बाप्पा मोरया या जयघोषाने महाराष्ट्राचे वातावरण दरवर्षी दुमदुमून जाते. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा, सामाजिक ऐक्याचा आणि लोकसहभागाचा जिवंत उत्सव आहे. घराघरातील गणरायाची प्रतिष्ठापना असो किंवा सार्वजनिक मंडळांचे भव्य देखावे असोत, या उत्सवातून श्रद्धा आणि समाजजीवन यांचे सुंदर मिश्रण दिसून येते. मात्र बदलत्या काळात या उत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक झाले असून त्यासोबत काही आव्हानेही निर्माण झाली आहेत. त्यामुळे परंपरेचा सन्मान राखत जबाबदारीने गणेशोत्सव साजरा करणे ही काळाची गरज बनली आहे.

**लोकमान्य टिळकांनी दिलेला सामाजिक अर्थ**

गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्याचे श्रेय लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जाते. १८९३ मध्ये त्यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकजागृतीचे प्रभावी माध्यम तयार केले. त्या काळात धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येऊ लागले. व्याख्याने, कीर्तन, नाटके आणि सामाजिक कार्यक्रमांमधून स्वातंत्र्याची भावना जागवली गेली. म्हणूनच गणेशोत्सव हा केवळ पूजा-अर्चेचा उत्सव नसून सामाजिक परिवर्तनाचा इतिहासही सांगतो.

गणेशोत्सवात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामाजिक सलोखा. विविध धर्म, जाती आणि समाजातील लोक एकत्र येऊन उत्सव साजरा करतात. शांतता समित्या, स्वयंसेवक आणि प्रशासन यांच्या समन्वयामुळे उत्सव अधिक सुरक्षित होतो. सोशल मीडियावर पसरविल्या जाणाऱ्या अफवा, भडकाऊ संदेश आणि द्वेषपूर्ण प्रचारापासून दूर राहणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

**युवकांची सकारात्मक भूमिका**

गणेश मंडळांमध्ये युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली तर समाजाला मोठा फायदा होऊ शकतो. वाहतूक नियोजन, आपत्कालीन मदत, रक्तदान, स्वच्छता मोहीम, डिजिटल साक्षरता आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या उपक्रमांमध्ये युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. गणरायाची सेवा म्हणजे समाजाची सेवा ही भावना अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

**शांतता, सलोखा आणि सामाजिक ऐक्य**

गणेशोत्सव हा सर्व समाजाला जोडणारा उत्सव आहे. विविध धर्म, जाती आणि पंथातील लोक एकमेकांच्या उत्सवात सहभागी होतात, ही महाराष्ट्राची मोठी परंपरा आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवणे, सोशल मीडियावर जबाबदारीने वागणे आणि प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे.

शांतता समित्या, स्वयंसेवक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वयामुळे उत्सव अधिक सुरक्षित आणि यशस्वी होतो.

**प्रशासन आणि नागरिकांची संयुक्त जबाबदारी**

यशस्वी गणेशोत्सवासाठी प्रशासन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, अग्निसुरक्षा आणि स्वच्छता यांची काटेकोर अंमलबजावणी झाली तर उत्सव अधिक आनंददायी ठरेल.

**स्थानिक मंडळांची जबाबदारी**

गावागावांतील आणि शहरांतील सार्वजनिक मंडळांनी उत्सवाचे नियोजन करताना सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. अग्निशमन व्यवस्था, विद्युत सुरक्षेची काळजी, महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवक, वाहतुकीचे योग्य नियोजन आणि ज्येष्ठ नागरिकांना अडथळा होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे, लोककला जपणे आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे हीदेखील मंडळांची महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे


**निष्कर्ष**

गणपती हा विघ्नहर्ता आणि बुद्धीचा अधिपती मानला जातो. त्यामुळे गणेशोत्सवातून केवळ भक्ती नव्हे, तर विवेक, संयम, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकतेचा संदेशही प्रत्यक्ष कृतीतून दिसला पाहिजे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची सामाजिक प्रेरणा आजही तितकीच महत्त्वाची आहे. परंपरेचा अभिमान आणि आधुनिक जबाबदारी यांचा सुंदर समतोल राखत प्रत्येकाने गणेशोत्सव साजरा केला, तर हा उत्सव खऱ्या अर्थाने समाजाला जोडणारा आणि विकासाचा मार्ग दाखवणारा ठरेल.

गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!

# फिरोज गांधी : निर्भीड संसदपटू आणि सजग प्रहरी

भारतीय संसदीय लोकशाहीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी सत्तेपेक्षा सत्याला अधिक महत्त्व दिले. त्यापैकी एक नाव म्हणजे फिरोज गांधी. १२ सप्टेंबर १९१२ रोजी मुंबईत जन्मलेल्या फिरोज गांधी यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला, पत्रकार म्हणून निर्भीड लेखन केले आणि खासदार म्हणून भ्रष्टाचाराविरोधात ठाम भूमिका घेत लोकशाहीला अधिक बळकट करण्याचे काम केले.






**स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग**

तरुण वयातच फिरोज गांधी महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित झाले. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या आंदोलनांमध्ये भाग घेतला आणि ब्रिटिश राजवटीविरुद्ध आवाज उठवला. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या सहभागामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. देशासाठी त्यांचे योगदान केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते, तर ते राष्ट्रनिर्मितीच्या व्यापक ध्येयाशी जोडलेले होते.

१९५२ मध्ये ते रायबरेली मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी अनेक महत्त्वाचे आर्थिक आणि प्रशासकीय प्रश्न उपस्थित केले. विशेषतः एलआयसी-मुंद्रा घोटाळा उघडकीस आणण्यात त्यांच्या भूमिकेची मोठी चर्चा झाली. या प्रकरणामुळे तत्कालीन अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांना राजीनामा द्यावा लागला आणि संसदीय उत्तरदायित्वाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले.

**नात्यांपेक्षा तत्त्वांना प्राधान्य**

फिरोज गांधी हे भारताच्या पहिल्या पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या इंदिरा गांधी यांचे पती होते. मात्र त्यांनी कधीही या नात्याचा राजकीय लाभ घेतला नाही. उलट सरकारच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करण्यास त्यांनी कधीही संकोच केला नाही. हीच त्यांची लोकशाहीविषयक निष्ठा होती.

**संसदीय परंपरेचे आदर्श**

आजच्या काळात संसदेतील सशक्त चर्चा, सरकारची जबाबदारी आणि जनतेच्या पैशाचा हिशेब मागण्याची परंपरा जपण्याची गरज अधिक आहे. फिरोज गांधी यांनी दाखवून दिले की, लोकप्रतिनिधीचे खरे कर्तव्य म्हणजे जनतेचा आवाज बनणे आणि सत्तेवर आवश्यक तेव्हा कठोर प्रश्न विचारणे.

**अखेरचा प्रवास**

८ सप्टेंबर १९६० रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. अवघ्या ४७ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी भारतीय लोकशाहीवर कायमस्वरूपी ठसा उमटवला.

**आजच्या पिढीसाठी संदेश**

फिरोज गांधी यांचा जीवनप्रवास आपल्याला शिकवतो की, लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती सत्य बोलणाऱ्या, सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या आणि जनहिताला सर्वोच्च मानणाऱ्या लोकप्रतिनिधींवर टिकते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# ललित प्रभाकर : चित्रपट सृष्टीचा 'चॉकलेट बॉय'

मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या सहजसुंदर अभिनयाने आणि साध्या स्वभावाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ललित प्रभाकर यांचा १२ सप्टेंबर रोजी वाढदिवस साजरा होत आहे. दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय मालिकांपासून नाटक, वेब सिरीज आणि चित्रपट अशा विविध माध्यमांत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा हा अभिनेता आज मराठी मनोरंजनविश्वातील सर्वाधिक लोकप्रिय कलाकारांपैकी एक मानला जातो.

**रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत**

१२ सप्टेंबर १९८७ रोजी कल्याण (महाराष्ट्र) येथे जन्मलेल्या ललित प्रभाकर यांचे पूर्ण नाव ललित प्रभाकर भदाणे आहे. त्यांनी संगणकशास्त्रात पदवी घेतली असली, तरी अभिनयाची ओढ त्यांना रंगभूमीकडे घेऊन गेली. किशोरवयातच त्यांनी मितीचार या नाट्यसंस्थेशी जोडून अनेक प्रयोगशील नाटकांमध्ये अभिनय केला. याच रंगभूमीने त्यांच्या अभिनयाला भक्कम पाया दिला.

**चित्रपटांतील प्रभावी अभिनय**

दूरचित्रवाणीनंतर त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतही दमदार पाऊल ठेवले. 'ची व ची सौ का' या चित्रपटातून प्रमुख नायक म्हणून त्यांनी लक्ष वेधून घेतले. त्यानंतर 'हंपी', 'अनंदी गोपाळ', 'सनी', 'मीडियम स्पायसी', 'तरी' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या.



विशेषतः 'अनंदी गोपाळ' चित्रपटात गोपाळराव जोशी यांची भूमिका त्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारली आणि त्यांच्या अभिनयाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

**प्रयोगशिल कलाकार**

ललित प्रभाकर हे केवळ अभिनेता नाहीत, तर दिग्दर्शन आणि रंगभूमीशीही त्यांचे घट्ट नाते आहे. त्यांनी प्रयोगशील नाटकांचे दिग्दर्शन केले असून अभिनयात सातत्याने नवे प्रयोग करण्याची त्यांची वृत्ती त्यांना इतर कलाकारांपेक्षा वेगळे ठरवते. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून मिळालेली यंग आर्टिस्ट स्कॉलरशिप ही त्यांच्या प्रतिभेची महत्त्वाची दखल मानली जाते.

**साधेपणामुळे चाहत्यांचा लाडका**

लोकप्रियतेच्या शिखरावर असूनही ललित प्रभाकर यांचा साधेपणा, विनम्र स्वभाव आणि कामावरील निष्ठा कायम आहे. सोशल मीडियावरही ते दिखाव्यापेक्षा आपल्या कलाकृतींना प्राधान्य देताना दिसतात. त्यामुळे तरुणांमध्ये ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखले जातात.

**मराठी चित्रपटसृष्टीची विश्वासार्ह ओळख**

आज मराठी चित्रपटसृष्टी राष्ट्रीय पातळीवर नवे स्थान निर्माण करत असताना ललित प्रभाकर यांसारखे कलाकार त्या प्रवासातील महत्त्वाचे चेहरे ठरले आहेत. सहज अभिनय, भूमिकेतील प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण मेहनतीमुळे त्यांनी प्रेक्षकांचा विश्वास संपादन केला आहे.

**वाढदिवसानिमित्त शुभेच्छा**

ललित प्रभाकर यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या अभिनयाचा प्रवास अधिक यशस्वी होवो आणि मराठी चित्रपटसृष्टीला त्यांच्या प्रतिभेचा लाभ पुढील अनेक वर्षे मिळत राहो, हीच सदिच्छा.

# रसिका जोशी : मनात घर करणारी चतुररत्र अभिनेत्री

मराठी रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपटसृष्टीत आपल्या सहज, जिवंत आणि प्रभावी अभिनयाने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या रसिका जोशी यांचा जन्म १२ सप्टेंबर १९७२ रोजी मुंबई येथे झाला. केवळ नायिका म्हणून नव्हे, तर प्रत्येक भूमिकेला वास्तवाचा स्पर्श देणारी अभिनेत्री म्हणून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर कायमची छाप सोडली. अवघ्या ३८व्या वर्षी त्यांचे निधन झाले, पण त्यांच्या अभिनयाचा ठसा आजही तितकाच ताजा आहे.





**रंगभूमीने घडवलेली कलाकार**

रसिका जोशी यांचा अभिनयाचा प्रवास मराठी रंगभूमीपासून सुरू झाला. लता नार्वेकर यांच्या 'उंचा माझा झोका' या नाटकातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. रंगभूमीने त्यांना संवादफेक, देहबोली आणि पात्राच्या भावविश्वात शिरण्याची ताकद दिली. पुढे त्या केवळ अभिनेत्रीच राहिल्या नाहीत, तर लेखिका आणि दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या 'White Lily & Night Rider' या नाटकाने समीक्षकांची दाद मिळवली.

मराठी मालिकांमधून घराघरात पोहोचलेली रसिका

१९९० च्या दशकात मराठी दूरदर्शनवरील 'प्रपंच', 'घडलंय बिघडलंय', 'बुवा आला' यांसारख्या मालिकांमुळे रसिका जोशी घराघरात पोहोचल्या. नंतर हिंदी मालिकेतील 'बंदिनी' मधील तारुलता (तारा फुई) ही त्यांची भूमिका विशेष गाजली. नकारात्मक छटा असलेल्या या भूमिकेला त्यांनी इतक्या ताकदीने साकारले की ती प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहिली.

**चित्रपटांतील अविस्मरणीय भूमिका**

रसिका जोशी यांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या. 'एक हसीना थी' या चित्रपटातून त्यांच्या अभिनयाची विशेष दखल घेतली गेली. त्यानंतर 'मलामाल वीकली', 'भूल भुलैया', 'जॉनी गद्दार', 'धोल', 'डार्लिंग', 'बिल्लू' यांसारख्या चित्रपटांत त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आजही लक्षात राहतात. 'भूल भुलैया' मधील जानकी उपाध्याय हे पात्र विशेष गाजले. मराठीत 'जबरदस्त', 'खबरदार' यांसारख्या चित्रपटांमध्येही त्यांनी दमदार अभिनय केला.

**लेखिका आणि दिग्दर्शक म्हणूनही वेगळी ओळख**

रसिका जोशी यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अभिनयापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी 'यंदा कर्तव्य आहे' या मराठी चित्रपटाची कथा आणि संवाद लिहिले. त्यांच्या लेखनात विनोद, संवेदनशीलता आणि वास्तववाद यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यामुळे त्या मराठी मनोरंजनविश्वातील बहुआयामी कलाकार म्हणून ओळखल्या जातात.

रसिका जोशी यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही भूमिकेचा दिखावा केला नाही. आई, मावशी, शेजारीण, खलनायिका किंवा विनोदी पात्र कोणतीही भूमिका त्यांनी इतक्या सहजतेने साकारली की ती पडद्यावर खरी वाटू लागायची. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, आवाजातील नैसर्गिकपणा आणि संवादातील ताकद यामुळे त्या भूमिकेत विरघळून जाणाऱ्या अभिनेत्री म्हणून ओळखल्या गेल्या.

कायम स्मरणात राहणारा वारसा

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे स्मरण करताना जाणवते की, मोठे स्टारडम मिळवण्यासाठी केवळ प्रमुख भूमिका आवश्यक नसतात; प्रामाणिक अभिनयच कलाकाराला अमर बनवतो. रसिका जोशी यांनी आपल्या अल्प कारकिर्दीत मराठी रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान आजही नव्या पिढीतील कलाकारांसाठी प्रेरणादायी आहे.

रसिका जोशी यांना वाढदिवसानिमित्त विनम्र अभिवादन! त्यांच्या अभिनयाचा सुगंध मराठी कलाविश्वात सदैव दरवळत राहो.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सण, उत्सव निमित्ताने नगरपरिषदेकडून 'निर्माल्य वाहन' लोकार्पण सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नगरपरिषदेच्या वतीने ऑगष्ट महिन्यापासून सण व उत्सवाची रेलचेल असल्याने प्रत्येक घरी तसेच शहरातील मंदिरामध्ये निर्माण होणारे निर्माल्य गोळा करण्याकरिता निर्माल्य संकलन वाहन तयार करुन निर्माल्य संकलनाचा नाविन्यपूर्ण उपक्रम नगरपरिषद आरोग्य विभागाच्या वतीने सुरू करण्यात आला.



श्रावण महिन्यापासून सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करण्याची सुरुवात होत असते. श्रावण महिना संपला की, हरतालिका, गणेशोत्सव गौरीपूजन, दुर्गोत्सव, दिवाळीत महालक्ष्मी पूजन व इतर सण व उत्सव प्रत्येक घरी मोठ्या भक्तीभावाने पूजा अर्चा करुन मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. पूजाअर्चा उत्सव साजरे करत असताना निर्माण होणारे निर्माल्य नदी, नाले, विहिरी व इतर जागी टाकल्या जात असते. ही बाब नगरपरिषद पदाधिकारी व आरोग्य विभागाच्या लक्षात आली असता त्याकरिता नगरपरिषद आरोग्य विभागाच्या वतीने निर्माल्य संकलन वाहन तयार करुन त्याचे लोकार्पण नुकतेच नगरपरिषद कार्यालय येथे नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे, बांधकाम सभापती ओमप्रकाश कांडलकर, महिला बालकल्याण उपसभापती माधुरी माहुरे, नगरसेवक हर्षल फुटाणे, पवन मोघे, शेख नासीर शेख बशीर, विजय चौधरी, नेपाल पाटील, आरोग्य निरीक्षक सुशील गुरवे, सफाई जमादार दीपक सोनेकर, सुनील शेंदरे, कुणाल आठवले यांच्यासह नगरपरिषद कर्मचारी व सफाई कामगाराच्या उपस्थितीत निर्माल्य संकलन वाहनाचे पूजन करुन ते वाहन ११ सप्टेंबर पासून प्रत्येक प्रभागात प्रत्येक घरा पर्यंत पोहोचून व शहरातील प्रत्येक मंदिरात निर्माण होणारे निर्माल्य गोळा करून कचरा डेपो मध्ये त्याचे वेगळे संकलन केले जाणार असून त्या निर्माल्यावर प्रक्रिया केली जाणार असल्याचे आरोग्य निरीक्षक सुशील गुरवे यांनी यावेळी सांगितले.

# आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये तान्हा पोळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्थेअंतर्गत आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये तान्हा पोळ्याचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.






या तान्हा पोळामध्ये कॉन्व्हेंटचे विद्यार्थी म्हणजे नर्सरी, के.जी.१, केजी टू च्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या तान्हा पोळामध्ये सर्वच विद्यार्थी खुप छान प्रकारे तयारी करुन आलेले होते. विद्यार्थी शेतकऱ्यांच्या वेशभूषेत आले होते आणि त्यांनी नंदीबैल उत्कृष्टयारित्या सजवुन आणलेले होते. काही विद्यार्थ्यांनी कोरडा दुष्काळ, फार्म हाऊस, बागायती शेती यांसारख्या प्रोजेक्ट तयार करुन आणलेले होते. सुरुवातीला मुख्याध्यापिका निता चिमोटे आणि परीक्षक म्हणुन लाभलेल्या कविता चौधरी आणि अपर्णा देशमुख यांनी सर्वच बैलजोडींची पुजा केली. नंतर परीक्षणाला सुरुवात केली तर या तान्यापोळ्यामध्ये वेशभुषेचे तीन क्रमांक, उत्कृष्ट नंदी बैल यांचे तीन क्रमांक आणि प्रोजेक्ट मध्ये तीन क्रमांक असे प्रत्येक वर्गामधून काढण्यात आलेले होते. यावेळी मुख्याध्यापिका निता चिमोटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आपल्या जीवनामध्ये शेतकऱ्याची कसे विशेष महत्त्व आहे हे छोट्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेकडून गिफ्ट आणि चॉकलेट देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मोनिका वानखडे, प्रगती सिनकर, प्रिती धार्मिक, दिपाली काळे व शिक्षकेत्तर कर्मचारी पालकांचे सहकार्य लाभले.

## आर.जी.कनिष्ठ महाविद्यालय वाठोडा चांदस येथे

# शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालय येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंतीनिमित्य 'शिक्षक दिनाचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




याप्रसंगी व्यासपीठावर एम.सी.व्हि.सी.चे विभागप्रमुख प्रा.मोहन तंबाखे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. सोबतच कला विभाग प्रमुख प्रा.उमेश कडू, प्रा.राहुल देशमुख आणि प्रा.सविता विरखडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात परमहंस श्री.यशवंतबाबा आणि डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रा.उमेश कडू यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जीवनावर प्रकाश टाकत शिक्षकांचे समाजातील स्थान आणि त्यांचे कर्तव्य तसेच विद्यार्थी विकासासाठी शिक्षक महत्त्वपूर्ण घटक असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी खुशाली अनिल जिचकार, दिपाली महादेव मडावी आणि प्रवीण सलामे या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनावर मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर उपस्थितांपैकी प्रा.सविता विरखडे यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जीवनावर प्रकाश टाकत देशाच्या विकासप्रक्रियेत शिक्षकांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्रा.मोहन तंबाखे यांनी विद्यार्थ्यांना दिल्या. कार्यक्रमाचे संचालन दुर्गा ढोमणे आणि आयुषी नान्हे तर उपस्थितांचे आभार तन्वी साबळे, दामिनी पोकळे यांनी मानले. कार्यक्रमाला श्यामलाल कोकाटे आणि विकास गायकी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## हनुमान मंदिर ओपन स्पेस परिसरात तान्हा पोळा उत्सव उत्साहात व जल्लोषात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – सागर मेघे फाउंडेशन, दत्ता मेघे फाउंडेशन व गिरीपेठ मित्र परिवार, पिपरी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने गिरीपेठ, वॉर्ड क्र. २ येथील हनुमान मंदिर ओपन स्पेस परिसरात भव्य तान्हा पोळा उत्सव उत्साहात व जल्लोषात पार पडला.

कार्यक्रमास पिपरी मेघेच्या सरपंच वैशाली गौळकर, माजी सरपंच तथा सदस्य अजय गौळकर, हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष कृष्णाजी जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. परिसरातील नागरिक, महिला व बालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घेतला. तान्हा पोळ्यानिमित्त लहान मुलांनी पारंपरिक पद्धतीने सजविलेल्या बैलांसह उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी प्रत्येक बालकाला आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.



वरुड : वरुड शहरात एका कार्यक्रमाकरीता आलेले रिलस्टार रवि वानखडे, श्रुतिका वानखडे, राजेश्वरी सरभुवकर, साहिल कडक, लोकेश प्रधान व साक्षी वाघ यांचे समवेत व्यासपिठावर शहरातील रहिवाशी चिमुकला सक्षम नयन वानखडे.

# माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप बुरंगे यांचा ग्रामगीता गौरव सन्मान पुरस्कार देवुन वरखेड येथे सन्मान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – आद्य ग्रामगीताचार्य रामकृष्ण बेलूरकर यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त संतभूमी वरखेड येथे आयोजित विशेष सोहळ्यात पंचायत समिती माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप बुरंगे यांना 'ग्रामगीता गौरव सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



शिक्षण क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य तसेच 'श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिरा'मध्ये सलग २२ वर्षे दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन बुरंगे यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, प्रचार प्रमुख गोपाल कडू, ह.भ.प.निलेश महाराज गावंडे, मराठी विद्यापीठ रिद्धपूरच्या अधिव्याख्याता प्रा.कोमल ठाकरे, भांबोरा येथील माजी सरपंच तथा पंचायत समिती वरूडचे सेवानिवृत्त कर्मचारी नरेंद्र कडू, माणिक वाचनालय वरखेडचे सचिव माणिकदास बेलूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी श्रीमती छाया दांडाळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात दिलीप बुरंगे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या दीर्घकाळाच्या शैक्षणिक व संस्कारक्षम कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. रामकृष्णदादा बेलूरकर यांच्या विचारांचा आणि ग्रामगीतेतील मूल्यांचा प्रसार करण्यासाठी कार्यरत असलेल्या या उपक्रमातून समाजात संस्कार, सेवा व शिक्षणाची प्रेरणा मिळत असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

# महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सौ.गं.सि.चौधरी कन्या हायस्कूलमध्ये शिक्षक दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** – येथील महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि सौ.गं.सि.चौधरी कन्या हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक डॉ.प्रा.सुभाष पारीसे तर प्रमुख पाहुणे म्हणुन ज्येष्ठ शिक्षक श्रीकांत जोशी, गोपाल जावरकर, प्रदीप उघडे आणि मुख्याध्यापिका संजया टाक उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हारार्पण करून व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात डॉ.पारीसे यांनी शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असून विद्यार्थी घडवणे, समाज घडवणे आणि राष्ट्र घडवणे यात शिक्षकाचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा.अमोल इंगळे, संगीता सरदार, सुनील नाईक, आशिष हिंगणे यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक डॉ.पारीसे यांच्या हस्ते श्रीकांत जोशी, सुनील नाईक, गोपाल जावरकर, प्रमोद खसारे, किशोर गहुकर, संजय गेडाम, प्रदीप उघडे, रवींद्र साव, युवराज बगाडे, संगीता सरदार, दिनेश मेश्राम, शशिकांत डेहनकर, आशिष हिंगणे, संजया टाक, अमोल इंगळे, मेघा सोमकुवर, जयश्री कडू तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मधुकरराव कवठकर, हिम्मतराव खवले, प्रशांत जोशी यांचा शाल व शिल्ड देऊन गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर अतिशय सुंदर भाषण करुन शिक्षकांप्रती आदर आणि सन्मानाची भावना व्यक्त केली. शिक्षकांचे विद्यार्थी निर्माणात असलेले योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दोन्ही शाळेचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विविध योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन; ७ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन व फलनिष्पत्ती करून घेण्यासाठी आवश्यक अनुभव असलेल्या शासकीय, निमशासकीय, मान्यताप्राप्त तसेच पात्र संस्थांकडून रीतसर प्रस्ताव मागविण्यात येत असल्याची माहिती सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी दिली आहे. मूल्यमापन करण्यात येणाऱ्या प्रमुख योजनानांमध्ये जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी कामे व योजना,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीअंतर्गतच्या योजना,महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना,पेसा योजना,भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना,वन विभागाच्या संबंधित तीन महत्त्वाच्या योजना,स्वर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना,जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या इतर संबंधित आवश्यक योजनांचा समावेश आहे.

योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी तांत्रिक क्षमता आणि आवश्यक पात्रता असणाऱ्या इच्छुक संस्थांनी आपले सविस्तर प्रस्ताव सात दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, जि. अमरावती यांच्या कार्यालयात जमा करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये संस्थेचा पूर्वअनुभव, यापूर्वी केलेल्या मूल्यमापन कामांचा सविस्तर तपशील, संस्थेकडील उपलब्ध मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता, संबंधित कायदेशीर कागदपत्रे आणि आर्थिक प्रस्ताव आदी माहिती सादर करणे आवश्यक राहील, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पतर्फे करण्यात आले आहे.

# मीना सोनकुसळे यांचा मान्यवरांचे हस्ते गौरव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून योगदान देणाऱ्या शिक्षक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या कार्याच्या गौरव करण्यासाठी आयोजित शिक्षण उत्सव २०२६ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पुसला येथील पी.एम.श्री जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक कन्या शाळेच्या सहाय्यक शिक्षिका मीना विजय सोनकुसळे यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार प्राप्त झाल्याबददल कार्यक्रमाच्या उदघाटन सत्राला वरिष्ठ अधिव्याख्याता पवन मानकर, विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर, गटशिक्षणाधिकारी श्वेता गोळे, नंदकुमार जाधव, रामेश्वर माळवे, शीला आठवले, विस्तार अधिकारी चंद्रशेखर रामटेके, सुनील खाडे, किरण पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी वरुडचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, नांदगाव खंडेश्वर व चांदूर रेल्वेचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, डॉ.नितीन उंडे, विस्तार अधिकारी चंद्रशेखर रामटेके, शिक्षिका सुनीता लहाने, शिक्षक अंकुश गावंडे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे,२३ केंद्रप्रमुख, ७० शिक्षक, विनोबा टीमचे अधिकारी व व्यवस्थापक उपस्थित होते. विभागीय व्यवस्थापक अमोल वानखेडे, कार्यक्रम व्यवस्थापक रघुनाथ कुक्कडे, सागर गजभिये, नेहा उपासनी यांच्यासह १६ व्यवस्थापक व अधिकारी उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत मीना विजय सोनकुसळे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. संचालन नेहा उपासनी आणि अब्दुल शहजाद यांनी तर आभार प्रकल्प अधिकारी सागर गजभिये यांनी मानले.









# शहापूर जि.प. शाळेत आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या शहापूर येथील जि.प.पूर्व माध्यमिक मराठी शाळा येथे आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

ज्ञानाचा प्रकाश प्रत्येक मनात पोहोचावा आणि अज्ञानाचा अंधकार दूर व्हावा, हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे.

साक्षरता म्हणजे केवळ वाचता–लिहिता येणे नव्हे, तर स्वत:चे विचार प्रभावीपणे व्यक्त करण्याची तसेच जगाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची शक्ती होय, याच उद्देशाने जि.प.पूर्व माध्यमिक



मराठी शाळा, शहापूर येथे आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी साक्षरतेचे महत्त्व समजून घेतले तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या घरी पालकांसोबत हा दिवस साजरा करुन साक्षरतेचा संदेश दिला. पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ज्ञानाचा प्रकाश प्रत्येक घरात पोहोचला तरच समाजाचा सर्वांगीण विकास साध्य होईल, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



**वरुड :** एका कार्यक्रमाप्रसंगी भाजप नेत्या तथा माजी खा.नवनीत राणा यांच्यासोबत पक्षाबद्दल हितगुज करतांना भाजप सरचिटणीस तथा माजी तहसिलदार कमलाकर देशमुख.

# जरूडच्या वसंतराव नाईक हायस्कूल येथे शिक्षक दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या जरुड येथील वसंतराव नाईक हायस्कूल येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष रामचंद्र पाटील, माजी प्राचार्य रामराव वानखडे, उत्क्रांती शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक व्हि बी.देवराळे यांचे मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षकांच्या सहकार्यातून करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी विविध भाषणे सादर केली. शिक्षकांच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली तसेच संस्थेच्या नियमानुसार विज्ञान विभागाचे विभागप्रमुख अनिस पठाण यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला ग्रामगीता प्रचार समितीचे कार्यकर्ते बापुराव मेंढे आणि केशवराव भोंडे महाराज उपस्थित राहून विद्यार्थ्यांना गुरुशिष्यांच्या नात्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी सचिन शेगोकर, रुपेश मेश्राम यांनी संस्थेतील मान्यवरांचा सन्मानपत्र देऊन सत्कार केला तसेच विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. शाळेत राबविलेल्या 'निवडणुक प्रक्रिया' उपक्रमात सर्वाधिक मतांनी निवडून



आलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन स्मिता पाटील, प्रास्तविक निशिगंधा काळे व आभार संदीप देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# मंत्रालयाचे ज्योतिष मार्गदर्शन केंद्र करु नये; 'कालायन' यंत्र बसवण्याचा निर्णय तातडीने रद्द करा

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी


(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने ४ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार मंत्रालय परिसर आणि महाराष्ट्र विधानभवन येथे प्रत्येकी एक 'कालायन' उपकरण बसविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या दोन उपकरणांसाठी ?१० लाख ९७ हजार ४०० रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे.मंत्रालयाचे ज्योतिष मार्गदर्शन केंद्र करणारा हा शासन निर्णय तातडीने रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत डॉ हमीद दाभोलकर, राहुल थोरात, प्रवीण देशमुख, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे, श्रीपाल लालवाणी यांनी केली आहे

प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की, भारतीय ज्ञानाच्या नावाच्या खाली खगोल विज्ञान आणि ज्योतिष यांची सरमिसळ करणारा हा निर्णय आहे शासन निर्णयात सागीतल्या प्रमाणे केवळ वेळ दाखवणारे घड्याळ नसून या मध्ये राशी, नक्षत्रे, पंचांग अशा सर्व गोष्टींची प्रमाण वेळेशी सरमिसळ केली आहे. या मधून कुठलाही वैद्यानिक आधार नसलेले ज्योतिष आणि खगोल विज्ञान हे एकाच असल्याचा भास निर्माण केला जात आहे.ग्रहांची स्थिती, त्यांची गती, सूर्योदय–सूर्यास्त यांची अचूक गणना करणे हा खगोलशास्त्राचा विषय आहे. मात्र ग्रह–नक्षत्रांच्या स्थितीचा आधार घेऊन एखाद्या व्यक्तीचे भविष्य, व्यक्तिमत्त्व, भाग्य किंवा जीवनातील घटना सांगता येतात, हा ज्योतिषाचा दावा वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही. त्यामुळे खगोलशास्त्रीय माहिती आणि ज्योतिषीय विश्वास यांना एकाच 'विज्ञानाधारित' चौकटीत मांडणे दिशाभूल करणारे आहे.

मंत्रालय हे महाराष्ट्राच्या प्रशासनाचे केंद्र आहे. विधानभवन हे लोकशाहीचे सर्वोच्च संस्थात्मक व्यासपीठ आहे. या ठिकाणी शासनाने अशा उपकरणाला अधिकृत स्थान देणे म्हणजे अप्रत्यक्षपणे ज्योतिषीय विचारांना शासकीय प्रतिष्ठा देण्यासारखे आहे. मंत्रालय हे धोरणनिर्मितीचे आणि लोकसेवेचे केंद्र असावे; ते ज्योतिष मार्गदर्शन केंद्र बनता कामा नये.असे देखील प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे

भारतीय संविधानाच्या कलम ५१ (अ) (ह) नुसार नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती विकसित करणे हे मूलभूत कर्तव्य आहे. शासनाकडून तर या मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन अधिक गांभीर्याने अपेक्षित आहे. त्यामुळे शासकीय वास्तूंमध्ये



विज्ञानाच्या नावाखाली वैज्ञानिकदृष्ट्या असिद्ध ज्योतिषीय दाव्यांना प्रतिष्ठा देणे हा संविधानाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या भावनेशी विसंगत प्रश्न आहे.

अंनिसचा भारतीय संस्कृती, पंचांग किंवा पारंपरिक कालगणनेच्या अभ्यासाला विरोध नाही. भारतीय कालगणनेचा इतिहास, प्राचीन भारतीय खगोलशास्त्रातील योगदान आणि विविध कालमापन पद्धती यांचा अभ्यास व प्रदर्शन निश्चितच केले जाऊ शकते. परंतु त्यासाठी खगोलशास्त्र आणि ज्योतिष यांच्यातील स्पष्ट सीमारेषा कायम ठेवणे आवश्यक आहे.

**अंनिसच्या प्रमुख मागण्या**

* मंत्रालय परिसर आणि महाराष्ट्र विधानभवन येथे 'कालायन' उपकरणे बसविण्यासाठी ४ सप्टेंबर २०२६ रोजी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता तातडीने रद्द करावी.
* सार्वजनिक निधीतून अशा उपकरणांवर खर्च करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र वैज्ञानिक व तज्ज्ञांकडून तपासणी करावी.
* शासनाच्या कार्यालयांमध्ये ज्योतिषीय दावे आणि वैज्ञानिक ज्ञान यांची सरमिसळ करणाऱ्या उपक्रमांना अधिकृत मान्यता देऊ नये.

शासन निर्णयातील आणखी एक बाब लक्षवेधी आहे. या उपकरणासाठी एका खासगी संस्थेने एुीर्शीोळेप `ष खर्पींशीर्शीं (ऐख) दिल्याचे आणि असे उपकरण बनविणारी ती एकमेव संस्था असल्याचे शासन निर्णयात नमूद आहे. त्यामुळे सार्वजनिक निधीतून हा खर्च करण्यापूर्वी या उपकरणाची वैज्ञानिक उपयुक्तता, शैक्षणिक मूल्य आणि शासनाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाशी असलेली सुसंगती यांचे स्वतंत्र आणि तज्ज्ञ परीक्षण झाले आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो.

महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी देशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अशा महाराष्ट्राच्या मंत्रालयात विज्ञानाच्या नावाखाली ज्योतिषीय विचारांना शासकीय प्रतिष्ठा मिळणे ही गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. असे प्रसिद्धी पत्रकाच्या द्वारे मधुकर गायकवाड, मुक्ता दाभोलकर, विनोद वायंगणकर, प्रकाश घादगीने, सम्राट हटकर, नीता सामंत यांनी कळविले आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६८५/२०२६** **ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) नसीम बानो रफिकउल्ला खा, वय अं.६३ वर्ष, धंदा– गृहिणी, २) जकिउल्लाखा रफिकउल्लाखा पठाण, वय अं.४९ वर्ष, धंदा– मजुरी, ३) रियाझुल्लाह खान रफिकउल्ला खान, वय अं.४५ वर्ष, धंदा– मजुरी, ४) शफीउल्ला खान रफिकउल्ला खान, वय अं.३९ वर्ष, धंदा– मजुरी, ५) रयाज रफिक उल्ला, वय अं.३७ वर्ष, धंदा– मजुरी

क्र.१ ते ५ रा.बंगला चौक, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत हबीब उल्ला खा जबर खा व मयत अमतुलबी हबीबउल्लाखा, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.


त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# पांढुर्णा गोटमारीत ११०० पेक्षा अधिक जखमी, ७ गंभिर : जत्रेत प्रचंड गर्दी

## पांढुर्णा वासियांनी तोडला ध्वज : शांततेत पार पडली गोटमार





(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पांढुर्णा** – मध्यप्रदेशातील पांढुर्णा ते सावरगाव दरम्यानच्या जाम नदीत परंपरेप्रमाणे गोटमार साजरी करण्यात आली. सकाळपासुन सुरु झालेली गोटमार सायंकाळी ६ पर्यंत सुरूच होती. शेवटी ६ वाजता पांढुर्णा वासियांनी झेंडा तोडला आणि अखेर माँ चंडिकेच्या मंदिरात पुजा करुन यात्रेची सांगता झाली. दिवसभर सुरु असलेल्या दगडफेकीत ११०० पेक्षा अधिक खेळाडू जखमी झाले. ज्यामध्ये ७ गंभीर खेळाडुंना नागपुर येथे पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये संजय घारपुरे, सचिन हाटेकर, पंकज बारमासे, सचिन नासरे, नितीन भादे, कैलास साहू, प्रितम राऊत यांचा समावेश आहे.

येथील गोटमार यात्रेला कोणी राजेशाहीमध्ये पेंढरी लोकांना शह देण्याकरीता गोटमार केल्याचे सांगतात तर कोणी पांढूर्णा आणि सावरगांवमध्ये एका युवक व युवतीचे सुत जुळल्याने प्रेमविवाह झाला होता तेव्हा काही लोकांनी या विवाहाला विरोध करतांना सावरगांवच्या वधूला पांढूर्ण्यात नेऊ नये म्हणुन गोटमार केल्याचा इतिहास आहे. तेव्हा या गोटमारीत नववधुसह मृत्यु झाल्याने दोघांचाही चंडीमातेच्या मंदीराजवळ समाधी दिली असल्याने त्यांच्या स्मृतीचे प्रतिक म्हणुन ही गोटमार यात्रा शेकडो वर्षांपासुन आजतागायत सुरु असल्याचे सांगतात. पोळयाच्या दुस:या दिवशी मध्यप्रदेशातील पांढूर्णा येथे ऐतिहासीक अशी गोटमार केल्या जाते. पोळयाच्या दिवशी जंगलातुन पळसाच्या झाड आणल्या जाते, सोबतच एक झेंडा सुध्दा लावल्या जातो, रात्रीला रात्रभर भजन–पुजन करून पहाटे ३ ते ४ वाजताच्या दरम्यान हा झेंडा पांढूर्णा आणि सावरगांवच्या मध्यावर असलेल्या जाम नदीमध्ये सुरेश कावले नामक ईसमाकडून नदीपात्रात रोवल्या जातो. त्यानंतर दुसरे दिवशी पांढूर्णा आणि सावरगांवचे नागरिक एकमेकांवर गोटमार करतात. या गोटमारीदरम्यान पांढूर्णा येथील हा झेंडा नदीपात्रातुन उचलुन नेतात. त्यानंतर मोठ्या गाजावाजात तो झेंडा चंडिमातेच्या मंदीरात नेल्या जातो, अशी या घटनेची आख्यायिका आहे. ही गोटमार करणा:या नागरिकांपैकी अनेक नागरिक अशिक्षीत आहेत तर त्यापैकी अनेक शेतकरी, शेतमजुर आहेत, त्यामुळे त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा आहे. ही गोटमार केव्हा सुरु झाली याबाबत कुठेही नोंद नाही. सदर झेंडा नदीपात्रामध्ये रोवणारे कावले यांच्या शेकडो वर्षांपासुनची ही पारंपारीक प्रथा कायम ठेवीत आहे. या गोटमारीत आतापर्यंत कित्येकांना प्राण गमवावे लागले आहेत तर कित्येकांना कायमचे अपंगत्व आले आहे, असे असतांना या गोटमारीप्रसंगी गोटा मारला नाही तर तो देवाला पावत नाही अशीही अंधश्रध्दा असल्याने चंडीमातेचा भक्त असलेला प्रत्येक नागरिक मात्र या गोटमारीत सहभागी होतो, विशेष म्हणजे गोटमार करणाऱ्यांपैकी अनेक जण मद्य प्राशन करुन असतात. पांढुर्णा येथे ३०० वर्षांहून अधिक काळापासून सुरु असलेल्या गोटमार मेळ्याच्या नावाने चालत आलेल्या परंपरेला अनुसरुन आज आमदार निलेश उईके यांनी माँ चंडी मातेच्या मंदिरात जाऊन गोटमार जत्रेत प्रार्थना केली व लोकांशी संवाद साधला नंतर, गोटमार यात्रेत, नदीच्या मध्यभागी हात जोडून ध्वजावर पाच दगड फेकण्याची परंपरा पाळली गेली. जिल्हा प्रशासनाच्या पथकाने व्यवस्था सांभाळली

पांढुर्णा जिल्ह्याच्या निर्मितीनंतर दुस:यांदा गोटमार मेळा आयोजित करण्यात आला असून यावेळी जिल्हाधिकारी नीरज कुमार वरिष्ठ यांनी मेळाव्याच्या तयारीत मोठे बदल केले. प्रथमच पांढुर्णा, छिंदवाडा जिल्ह्याव्यतिरिक्त सिवनी आणि बैतूल जिल्ह्यातून वैद्यकीय पथकांना पाचारण करण्यात आले. रुग्णवाहिका आणि इतर साधनांची संख्याही दुप्पट करण्यात आली. वैद्यकीय शिबिरात पूर्वीपेक्षा जास्त कर्मचारीही तैनात करण्यात आले होते. जखमींना गोटमारस्थळावरुन रुग्णालयात नेण्यासाठी खास कॉरिडॉरचीही व्यवस्था करण्यात आली होती. एसपी प्रकाशचंद्र परिहार यांनीही जत्रेबाहेर अनपेक्षित घटना घडू नयेत यासाठी ६०० हून अधिक फौजफाटा तैनात केला होता. महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने लोक येत असतात. यावेळी गोटमारमध्ये सहभागी होण्यासाठी पांढुर्णा आणि छिंदवाडा जिल्ह्या व्यतिरिक्त नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांतील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने लोक पांढुर्णा येथे पोहचले होते. दुपारपर्यंत एका अंदाजानुसार १५ हजारांहून अधिक लोक गोटमार यात्रेत पोहोचले होते. याशिवाय ही संख्या सातत्याने वाढत होती. जत्रेला समांतर गुजरी बाजार, हनुमंती वॉर्ड आणि शारदा मार्केटमध्येही मोठ्या प्रमाणात मनिहारी आणि मुलांच्या खेळण्यांची दुकाने पाहायला मिळाली. माँ चंडिका देवीच्या मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची गर्दी झाली होती. सकाळी १० वाजेपर्यंत शेकडो लोकांनी दूरवरून राष्ट्रध्वजाचे पूजन केले.

सायंकाळी ६ वाजता पांढुर्णा वासियांनी झेंडा तोडला आणि माँ चंडिकेच्या मंदिरात पुजा करुन यात्रेची सांगता झाली.




# उदापूर शेतशिवारात जंगली जनावराची दहशत

## ४ वर्षांच्या कालवडीचा बळी; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – उदापूर परिसरातील शेतशिवारात जंगली जनावराच्या हल्ल्यामुळे राजेंद्र तिनखेडे यांच्या ४ वर्षांच्या कालवडीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे.

रात्रीच्या वेळी शेतात जाणेही धोकादायक ठरत असून जंगली जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून हल्ला नेमक्या कोणत्या जंगली प्राण्याने केला? याचा तपास करावा तसेच परिसरात गस्त वाढवून शेतकरी व पशुधनाच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे. उदापूर परिसरात जंगली जनावरांचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी रानडुक्कर, नीलगाय, कोल्हे तसेच इतर जंगली प्राणी शहराच्या हद्दीत येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी आणि रात्री फिरण्यासाठी बाहेर पडणारे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच दुचाकीस्वार यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे.

